।। श्री सद्गुरु प्रसन्न।।

ज्ञानामृतं भोजनम्।

# पाझर अमृताचा

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2004/14372

◈ वर्ष ८ वे ◈अंक १ला ◈ माघ-फाल्गुन शके १९३२ ते चैत्र-वैशाख १९३३ ◈४ फेब्रुवारी ११ ते १ जून ११

**प्रकाशक व मुद्रक:**

**श्री प्रदीप कुलकर्णी**

**मालक :**

**श्रीदत्त प्रकाशन,**

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर

{नोंदणी क्रमांक : E-17128 (M)}

संपर्क : ९८२०५४९४१५

**प्रकाशनस्थळ :**

**श्रीदत्त प्रकाशन,**

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर,

डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २,

गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

**मुद्रणस्थळ :**

**सुदर्शन प्रिंटिंग प्रेस**

१०, वडाळा, उद्योग भवन, वडाळा, मुं - ३१.

संपादिका : **सौ. नीता कुलकर्णी**

संपादन सहाय्य : **सौ. प्रतिभा गोखले**

**सौ. शामला आपटे**

## अंतरंग

◆ **Good Behaviour**

- श्रीसस माधुरीनाथ ०३

◆ **भक्तगाथा -** ०७

◆ **गोजिरवाणी -**

सौ. नीता कुलकर्णी ०९

◆ **अहो ऐकलंत का? -**

- सौ. रेश्मा १०

◆ **सोनियाचा दिनू आजि अमृते पाहिला! -**

- प्रदीप कुलकर्णी १३

◆ **विकाराकडून निर्विकाराकडे**

- मुक्ता १५

◆ **आनंदाचे डोही आनंद तरंग -**

- सिद्धेश १६

◆ **शब्दांच्या पलिकडले-**

- मधुरा १८

◆ **मुंगी उडाली आकाशी -** २१

- आकांक्षा

◆ **उत्सव विशेष -** २३

***Good Behaviour*** **- श्रीसस माधुरीनाथ**

# वैश्विक एकात्मतेकडे नेणारा एक मार्ग...✍
# सदाचरण

**सद्‌गुरू -** 'भोवऱ्यामुळे बिंदुभोवती रिकामी जागा भासु लागली' हे वाक्य मी म्हटले होते. बिंदुच्या ठिकाणी तू उभा राहिलास आणि सभोवार पाहू लागलास तर तुला ती पोकळी असल्याचा भास होईल. अशाप्रकारे परब्रह्मींचे अस्तित्त्व तेथे असते. पण मायेच्या अज्ञानभ्रमाच्या नास्तित्त्वाने झाकल्या जाते. हाच अवकाशाचा (आकाशाचा)सूक्ष्म अंश! भोवरा म्हणजे हालचाल म्हणून वायुतत्त्वाचा सूक्ष्म अंश! 'मी मलाच पहावे' ही इच्छा हाच सूक्ष्म तेजांश! पोकळी नरम असते हा आपाचा सूक्ष्म अंश! आनंदसागर असताना आनंदाचा शोध घेणे हा मुर्खपणाच! जडताच म्हणून पृथ्वीचा सुक्ष्म अंश! म्हणुनच पंचभुते अनादि म्हटली गेली. इथे परत ईश्वर क्षणभर थांबला, त्यामुळे परब्रह्म जे तेथे होतेच त्याने आकार धरला त्यामुळे तो आनंदसागरात विरघळून गेला नाही.

**शिष्य-** ती रूपे (आकार) कोणती? त्यांना वेगवेगळी नावे दिली गेली का? किंवा तेच म्हणजे ईश्वर?

**सद्‌गुरू-** तत्त्ववेत्त्यांनी या रूपांना वेगवेगळी नावे दिली, त्यामुळे त्यांना भक्तीसाठी (पूजेसाठी) वेगवेगळ्या प्रतिमा किंवा मूर्ती मिळाल्या. नास्तिकांनी त्याला निसर्ग असे नाव दिले. त्यामुळे नंतर भक्ती किंवा पुजेचे कामच राहात नाही.काही तत्त्वचिंतक दृश्यपदार्थ आणि त्यावर कार्यरत असलेल्या आकलनीय शक्ती इथपर्यंतच विचार करतात. त्यामुळे ते **जगन्नियंता** किंवा त्याच्या **संकेताला** ओळखू शकत नाहीत. कारण ते **प्रबोधनशक्तीचा** वापरच करत नाहीत. परिणामतः ते **वेदांताचा** वापरच करू शकत नाहीत. **वेदांत** म्हणजे (विश्वातील) सर्व घटनांत(दृश्यभास्य पदार्थ व त्यातील घडामोडीत)मूलभूत परब्रह्म तत्त्व असल्याचे देणारी विचारसरणी! (प्रबोधनशक्तीचा वापर न केल्याने) ईश्वर आणि जीव शेवटापर्यंत वेगवेगळेच राहतात.

**शिष्य-** महाराज, कृपा करून मला ते समजावुन सांगा ना! ईश्वराच्या विविध प्रतिमांमधील विविधता मला ओळखता येईल.

**सद्‌गुरू -** पहिला टप्पा आठव. बिंदुं (कण) जड, स्तब्ध, खरा (पूर्वी होता तसाच



राहिला) आणि आनंदाचाच बनलेला होता. याला **सदाशिव** म्हणतात आणि त्याच्या जाणिवेला **शांभवी माया** म्हणतात. दुसरा टप्पा अशा प्रकारचे अनेक बिंदु एकत्र आल्यामुळे लांबच लांब रेखा निर्माण झाली. पुढे ती फुगीर व वक्राकार झाली. त्यामुळे बिंदुसन्मुख असलेली एक आणि बिंदु विन्मुख असलेली दुसरी अशा दोन बाजु निर्माण होऊन त्यातुन दोन रूप उद्‌भवली. मुलभूत बिंदु सन्मुख अर्थात मुलभूत परब्रह्माचे ज्ञान अवगत असलेली एक (महाकारण किंवा विद्यामाया) आणि दुसरे अविद्यात्मक रूप अगदी बाजुला जाणारे, विस्मरण शक्ती असलेले (कारण किंवा अविद्यामाया). इथे क्षणभर विश्रांती होती की ज्यामुळे परब्रह्माने ते धारण केले. विद्या मायोपाधीतील परब्रह्म परमात्मा **(समर्थ ज्ञानात्मा)** किंवा परमेश्वर म्हटला गेला. अविद्या मायेतील परब्रह्म **जगदात्मा** किंवा **गुणक्षोभिणी** (GOD) म्हणजेच , विश्वाच्या उत्पत्ती, स्थिती, लयाचा अनुशासक म्हटल्या गेले. तिसऱ्या टप्प्यात त्रिगुणांचा उद्‌भव झाला.

१. सत्त्व-ज्ञान बिंदुरुपाकडे झुकलेला गुण.

२. रज- इतर दोघांमध्ये कुठेतरी फिरत रहाणारा.

३. तम- ज्ञान बिंदुरूपापासून दूर जाणारा.

येथे पुन्हा पळभर विश्रांती आहे. त्यामुळे परब्रह्मनाने ते धारण केले आणि त्यामुळे एकमेकात मिसळले नाहीत. सत्त्व गुणापासून आकाशाचा सुक्ष्मांश तयार झाला. रजोगुणापासून वायुतत्त्व (हालचाल), प्रकाशतत्त्व आणि आपतत्त्व (प्रवाही पदार्थ) असे तीन सूक्ष्मांश तयार झाले. तमोगुणापासून पृथ्वीतत्त्व तयार झाले.

इथे परत परब्रह्माने हे सर्व (ही रचना)धारण केले. त्यामुळे ते एकमेकात मिसळुन परस्परनाशक ठरले नाहीत असे अनेक बिंदु एकत्र येऊन आजच्या विश्वाचे प्रचंड मोठे रूप तयार झाले.

सत्त्वगुण आणि आकाश तत्त्वाची अनुशासक देवता विष्णु म्हटल्या गेली, तो सर्व विश्वाची काळजी वाहतो आणि अशाप्रकारे अनुशासन करतो की अन्याय अजिबात होणार नाही. अशाप्रकारे विश्वाचा स्थितीपालक देव आहे विष्णु! रजोगुण आणि वायुतत्त्व, तेजतत्त्व (उर्जा, अग्नि), आपतत्त्व यांच्या सहाय्याने विश्वरचनेची अनुशासक देवता **विधी** किंवा **ब्रह्मदेव** म्हटल्या गेली. तमोगुण आणि पृथ्वीतत्त्व याची अनुशासक देवता **महेश** म्हटली गेली. तमोगुणाच्या सहाय्याने निकामी पदार्थांचा नाश तो करत असतो. म्हणून पदार्थांच्या विनाशाची अनुशासक देवता **महेश** आहे. पृथ्वी तत्त्वाचे(मोठमोठे) भूगोल तयार होऊन अवकाशात पसरले (इतस्ततः) विविध

तारे आणि ग्रह यांनी भरलेली आकाशगंगा अवकाशांत तुम्ही पाहु शकता. अवकाश दोन भागात विभागल्या गेले. एक आकाश म्हणजे आकाश गंगेतील प्रत्येक भू-गोला सभोवती असणारे वातावरण आणि दुसरी विश्वातील निर्वात पोकळी! वायुतत्त्व जड आणि चैतन्य यामध्ये विभागल्या गेले. तेजतत्त्व प्रकाश(अग्नि) आणि उर्जा यात विभागल्या गेले. पृथ्वीतत्त्व मोठमोठे पहाड आणि माती यांत विभागले गेले. हेच ईश्वराचे दश अवयव होत.

**ईश्वराचे दशअवयव**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| आकाश | वायू | तेज | आप | पृथ्वी |
| वातावरण | जड | प्रकाश | पाणी | पहाड |
| अवकाश | चैतन्य | उर्जा | ग्रहगोल लाव्हा | माती |

**ईश्वराचे देह**

| | | | |
|---|---|---|---|
| पद | असिपद | आनंदपद | चित्पद |
| वाचा | नेवाचा | वाचातीत | अनिर्वाच्य |
| देह | विराट | हिरण्यगर्भ | मूलाज्ञान |
| अवस्था | उत्पत्ती उद्‌भव | स्थिती | प्रलय |
| अभिमानी | ब्रह्मदेव | विष्णू | महेश |
| गुण | निराकार(अरूप) | निर्गुण(गुणातीत) | चैतन्य |

इथे तत्पद ईश्वराचे वर्णन संपुर्ण होते. त्यातच नंतर सजीवांची उत्पत्ति झाली.

**शिष्य :** महाराज! महाराज!! महाराज!!! हे सर्व गोंधळात टाकणारे आहे. कृपया थोडेसे थांबा. मला आधुनिक शास्त्राप्रमाणे परत समजवा, या सर्व घटनाक्रमात नक्की काय घडले असावे ते!

**सद्‌गुरू :** परत लक्षपूर्वक ऐक. आजचे हे विश्व कसे घडले असावे हे मी तुला समजावयाला जात आहे. तुला त्यातील मुलभूत विचार कळला पाहिजे. जर तुला खगोलशास्त्र माहित असेल तर शास्त्रज्ञानी ताऱ्यांचा जन्म असा वर्णिला आहे की, ''अचानक अवकाशात काही दिसत नसताना, अचानक वादळ उठते. एकतर स्वयंप्रकाशी कण दिसू लागतात किंवा वीज चमकते. नंतर स्वयंप्रकाश मोठा गोळा, तारा दिसू लागतो. काहीवेळा इतर ताऱ्यांच्या गुरुत्वाकर्षण बलामुळे त्यातील काही वस्तुमान



त्यापासून दूर होते आणि त्याच प्रचंड मोठ्या स्वयंप्रकाशी ताऱ्याभोवती फिरू लागते आणि तोच त्या ताऱ्याचा ग्रहगोल असतो. लाव्हारस थंड होतो. शेवटी पृष्ठभागावर पर्वत टेकड्या आणि माती तयार होते.'' हेच सर्व काही आता थोड्या वेळापूर्वी मी तुला सांगितले.

**शिष्य :** पण महाराज! ते मूलाज्ञान वगैरे?

**सद्‌गुरू :** ऐकतर, माझ्या लाडक्या! ताऱ्याच्या जन्मापूर्वी मुलभूत परब्रह्म अदृश्य असल्याने आणि आधुनिक शास्त्रज्ञांना परब्रह्म तत्त्वाचे ज्ञान नसल्याने ते समजतात कि अवकाश रिकामे होते, एवढेच आहे. परंतु तुझ्या देहांतर्गत **परब्रह्म** तत्त्व तू प्रथम बोधात समजाविल्याप्रमाणे जाणू शकतोस आणि 'ते तू आहेस.' एकदा का ग्रहगोल अर्थात् पृथ्वी तयार झाली की तुला सजीव सृष्टीचा म्हणजेच जीवशास्त्राचा विचार करायचा आहे. परंतु यातसुद्धा जीवशास्त्र फक्त स्थूळ देहाचा विचार करते आणि सूक्ष्म देह किंवा कारण देह याचा सर्वंकष विचार करीत नाही. सजीव सृष्टीची पंचभौतिक पार्श्वभूमिका तुला समजली का?

**शिष्य :** महाराज! बोध देताना तुम्ही म्हणालात की, अव्याकृत आणि विद्यातनू (मायातनू) हे ब्रह्मांडाचे कारण व महाकारण देह आणि आता म्हणता आहात मूलाज्ञान (मूळमाया) हा ईश्वराचा तिसरा देह आणि हा 'हिरण्यगर्भ' म्हणजे नक्की काय? आपण मला हे आधुनिक शास्त्रीय भाषेत समजावून सांगाल का?

**सद्‌गुरू : 'बोध'** हि आत्मज्ञानाची पहिली पायरी आहे. त्यावेळी जीवाला भौतिक स्थूळ देहाची सवय असते. आणखी देहांतील काही कळत नाही. त्यामुळे सद्‌गुरु प्रेमाने हळूहळू शिष्याला समजावतात. जगतातील अनुभवामुळे त्रस्त झालेला शिष्य (मुमुक्षु) मोह, अहंकार, पुण्य-पापात्मक कर्माभिमान सोडून देतो आणि म्हणूनच स्थूळ देह तसेच सूक्ष्म देह यांना त्यांच्या नशिबावर टाकून देऊन **परब्रह्मी** तादात्म्य पावतो.

परंतु असे जे असत नाहीत ते बोध देतेवेळी तर समजतात. परंतु आत्मज्ञानाचे खरे अधिकारी नसल्याने 'एक गरीब बिचारा जीव जो जगन्नियंत्याकडून नियंत्रित केल्या जातो आणि नियंत्रक सूत्र असते भाग्यरेषा (नशीब, विधिलिखित)' असा पूर्ववत होऊन जातो. म्हणूनच बोध अर्थात 'त्वंपद्‌शोधन' किंवा 'जीव-ब्रह्म-ऐक्य' हि आत्मसाक्षात्काराची शेवटची पायरी (चरमस्थिती) ठरू शकते. सद्‌गुरूदेवांनी एकदा शिष्य म्हणून स्वीकारल्यावर ते सर्व गोष्टी तुम्हाला समजावून देतात आणि शंकामुक्त करतात.

◈◈◈

# भक्तगाथा...✍

परगावी जाण्याकरिता पत्नीची संमती मिळाल्यावर बलभीमास फारच आनंद झाला व त्याने इंदूर येथे जुन्या तोफखान्यात त्याच्या एका ओळखीच्या गृहस्थाकडे जाण्याचे ठरविले. त्याप्रमाणे दोन दिवसात सर्व तयारी करून सौ. कृष्णाबाई व मुलगा दत्तात्रय यांसह बलभीम इंदूरास आपल्या एका मित्राच्या घरी जाऊन उतरला. त्या घरात दोन खोल्या निराळ्या घेऊन तेथे बिऱ्हाड केले व दुसरे दिवसापासून आपला भजन-पूजनादिक नित्यक्रम सुरू केला. बलभीमास लहानपणापासूनच वारकरी मंडळीची संगत असल्यामुळे श्री तुकाराम, श्री ज्ञानेश्वर अशा संतांचे बरेच अभंग पाठ येत असत व तो ते फार प्रेमळपणे म्हणत असे त्याचप्रमाणे वारकरी सांप्रदायातील प्रधान ग्रंथ 'श्री ज्ञानेश्वरी' बलभीमास फार आवडे.

दररोज एक तासभर तरी ज्ञानेश्वरीचे मन:पूर्वक वाचन तो करीत असे. ज्ञानेश्वरीच्या कित्येक ओव्या त्यास मुखोद्‌गत होत्या.बलभीम सकाळी व संध्याकाळी हातात टाळ घेऊन भजनास बसे, त्यावेळेस भजनानंदात रंगून जाई. करूणापर अभंग म्हणताना त्याचा कंठ दाटून येई. बलभीमास चांगले नाचता येत असे. श्री हरिच्या लीला गाऊन आनंदाने व नामच्छंदाने तो प्रेमळ नृत्य करीत असे. पांडुरंगाची मूर्ति मनी आठवून, तिचे ध्यान करण्यातही त्याचा बराच वेळ जात असे. कधी कधी त्या कल्पनामय मुर्तीशी सलगीची भाषणे करी व म्हणे की 'प्रभो! आपण मला दर्शन देऊन केंव्हा चिरसुखी कराल? माझ्या मनातील सर्व संशय दूर करणारा शांत व ब्रह्मनिष्ठ असा सत्पुरूष मला केव्हा भेटेल व माझ्या जन्माचे सार्थक केव्हा होईल?'

अभंग-

**अभंग १.** *तारि तारि तारि मज देवराया। नाही तरी वाया जात असे।।*
*कन्या पुत्र मित्र माता पिता बंधु। यांचा तो संबंधू कळो आला।।*
*हे तव आहे सुखाची मांडणी। पहाता निर्वाणी कोणी नाही।*
*पहाता निर्वाणी दुजे कोणी नाही। धाव चक्रपाणी वेडा म्हणे।।*

**अभंग २.** *बाळा मातेविण दुजे कोण सांगा। का? गा! पाडुरंगा उपेक्षिले।।*
*का? गा! नारायणा! झालासी निष्ठूर। कृपेचा सागर असोनिया।।*
*तुजवीण कोण होईल सांगाती। सांगा जी श्रीपती विचारोनि।।*
*वेडा पायापाशी घालीतो लोळणी। कैसी तुझ्या मनी दया न ये।।*



बलभीम हे सहज स्फुर्तीचे अभंग मोठ्या प्रेमाने म्हणत असे. बलभीमाची खोली म्हणजे भजनीमेळ्याचे ठिकाणच होऊन बसले.

इंदुर येथील इमली बाजारातील मारुतीच्या पिछाडीस पत्रावळे यांच्या विठ्ठल मंदिरातील मंडळीस कोणी एक प्रेमी भजनी बोवा आला आहे असे कळले. तेव्हा त्यांनी बलभीमाकडे येऊन आपले मंदिरात भजनास येण्याविषयी त्यास विनंती केली. ती विनंती मान्य करून बलभीम तेथे भजनास गेला. बलभीमाचे साधे व प्रेमळ भजन ऐकून सर्व श्रोत्यास फारच आनंद झाला. भजन झाल्यावर सर्व मंडळी खाली बसली व त्यांनी बलभीमास मंदिरातच येऊन राहण्याविषयी विनंती केली. त्याने त्यांच्या विनंतीस मान देऊन दुसरे दिवशी आपले सर्व बिऱ्हाड मंदिरात आणून ठेवले. थोडेच दिवसात बलभीमाच्या मुलावर व कृष्णाबाईवर पत्रावळे व त्यांची बायको या उभयतांचे फारच प्रेम जडले व पत्रावळे त्या तिघांना बहुतेक दररोज भोजनास बोलवित असत.

एके दिवशी पत्रावळे यांच्या पत्नीकडे इंदूरचे जुने (मामलतदार) अमीनसाहेब यांची पत्नी आली होती. ती फार आजारी व कृश झाली होती. तिने नानाप्रकारचे औषधोपचार केले पण तिला बरे वाटत नव्हते. त्या बाईस पाहिल्यावर कृष्णाबाईने नुसत्या नजरेनेच तिच्या रोगाचे निदान केले व साधे घरगुती औषध घेऊन पहाण्यास सांगितले. त्या बाईस लगेचच त्याचा गुण आला.

आपल्या बायकोची प्रकृती बलभीमाच्या पत्नीने औषध देऊन सुधारली व पूर्ववत केली हे अमिन साहेबांना कळताच त्यांनी बलभीमास बायको व मुलगा यांसह घरी बोलावून घेतले व पाहुणचार केला. अमिन साहेबांनी बलभीमास नोकरी धरण्याचा आग्रह केला. भिडस्त स्वभावामुळे बलभीमाने अगदी नाखुशीनेच अमिनसाहेबांच्या आग्रहास मान दिला व किल्ल्याजवळील नाक्यावर एका नाकेदाराची नोकरी पत्करली. तेथे काही दिवस काम केले. पण नोकरीमुळे ध्यान, धारणा, पारमार्थिक वाचन व मनन या गोष्टी कमी कमी होत गेल्या. नोकरीचे कामातच ९/१० तास जात. त्यामुळे लवकर नोकरीचा वीट येऊन बलभीमाने नोकरीचा कायमचा रामराम ठोकला व पुढे पोटासाठी अथवा धनप्राप्तीसाठी कोणचाही धंदा अथवा नोकरी करावयाची नाही असा निश्चय करून पुनश्च भजन पूजनाचा नित्यक्रम मोठ्या उत्साहाने सुरू केला.

◈◈◈

# गोजिरवाणी...✍

- सौ. नीता कुलकर्णी

**आजी-** मुलांनो ऐका बरं का! एका गावात अनिकेत आणि अजय असे दोघे भाऊ रहात होते. त्यापैकी अनिकेत मोठा व अजय छोटा भाऊ!

**मुले-** मग पुढे काय झाले आजी?

**आजी-** अरे, एकदा अनिकेत दरवाजात उभा असतानाच एक धडधाकट माणूस आला व म्हणाला, ''साहेब! मला थोडे पैसे द्या नं! मी दोन दिवसांचा भुकेला आहे.''अनिकेत होता दयाळू! त्याने त्यास पोटभर अन्न दिले.

**मुले-** हो आजी?

**आजी-** अरे हो! दुसऱ्या दिवशीही तो माणूस परत दाराशी आला. पण आज मात्र घरात अजय होता. तो अजयला विचारू लागला, ''इथले साहेब कोठे गेले?'' अजयला तो अनिकेत विषयी विचारीत असलेले लक्षात आले व तो म्हणाला,''ते बाहेर गेले आहेत. तुझे काय काम आहे?'' अजयचा आवाज थोडासा करडाच होता. कारण अजय स्वभावाने थोडासा कडकच होता. तो माणूस परत म्हणाला, ''साहेब मला थोडे पैसे द्या नं! मी भुकेला आहे.''

**मुले-** मग दिले त्याने पैसे?

**आजी-** नाही. तो म्हणाला, ''तू तर चांगला धडधाकट दिसतोस! काही तरी काम कर. हे बघ, उद्यापासून तू माझ्या ओळखीच्या माणसाकडे कामाला जा. तिथे तुला ते पेपर टाकण्याचे, तसेच इतरही काही कामे करायला ठेवून घेतील व त्या बदल्यात तुला ते पैसे देतील, त्यात तुझी रोजी रोटी बाहेर पडेल.''असे सांगुन त्याला एका सदगृहस्थाचा पत्ता व बरोबर एक पत्र दिले. ते घेऊन तो माणूस निघुन गेला.

**मुले-** मग पुढे काय झाले आजी?

**आजी-** अरे, नंतर बरीच वर्षे उलटून गेली. काही दिवसांनी एका कार्यक्रमाची निमंत्रणपत्रिका घेऊन एक इसम आला. त्याने दोन्ही भावांना आपल्या मालकातर्फे आग्रहाचे आमंत्रण दिले व कामाच्या व्यस्ततेमुळे ते येऊ न शकल्याचे सांगितले.



**मुले** - मग गेले का दोघे त्या कार्यक्रमाला?

**आजी-** अरे, हो दोघेही वेळेवर कार्यक्रमास पोहोचले. एका उद्योजकाने एका नव्या उद्योगाची सुरूवात केली होती. त्याचा तो सोहळा होता.खूप मोठे मोठे लोक निमंत्रितांमध्ये बसलेले होते.पहिल्याच रांगेत दोन्ही भावांची बसण्याची व्यवस्था केली होती. दोघेही आश्चर्यचकित झाले. कार्यक्रमास सुरूवात झाल्यावर मुख्य व्यक्ति भाषणास उभी राहिली. तिला पाहून दोन्ही भावांना ओळखीचा चेहरा वाटला. पण नक्की आठवेना! एका मोठ्या उद्योग समुहाचे मुख्य होते ते! ते म्हणाले, ''अनिकेत या व्यक्तिने मला माझ्या पडत्या काळात फारच मदत केली. म्हणूनच मी आजवर ही प्रगती करू शकलो. त्यांनी मी भुकेला असताना धुडकावून न देता मला पोटभर अन्न दिले. ते आज येथे आलेले आहेत. त्यांच्या कदाचित हे लक्षातही नसेल! पण काही वर्षापूर्वी मी त्यांच्याकडे गेलो होतो.'' अनिकेत आठवण्याचा प्रयत्न करू लागला. इतक्यात वक्त्याने भाषण पुढे नेले. तो म्हणाला, '' आणि या संपूर्ण उद्योगाचे खरे मालक हे अजय आहेत.'' अजयला तर धक्काच बसला.

**मुले-**पुढे सांग ना आजी!

**आजी-** अरे पुढे ते म्हणाले, ''अजय साहेबांनी तर मला पैसे वगैरे काहीच दिले नाहीत. फक्त त्यावेळी माझ्या आळसाला घालवण्याचा कडक सल्ला दिला व एक छोटीशी नोकरी मिळवून दिली. पुढे त्यातूनच पैसे साठवून मी स्वतःचा उद्योग उभा केला व इथवर पोहोचलो. त्यामुळे माझ्या यशाचे खरे मानकरी तर तेच आहेत.''

**मुले-**तो पैसे मागणारा माणुसच भाषण करीत होता ना?

**आजी-** अरे हो, अनेक वर्षापूर्वी अजयकडून नोकरी मिळविणारा हाच तो इसम होता. बरं का मुलांनो, अनिकेतने त्याच्यावर दया दाखविली होती. पण त्यामुळे तो काही स्वावलंबी बनला नव्हता. तर त्याचा खरा मार्गदर्शक व उपकारकर्ता अजयच होता. कारण त्याने त्याला स्वंतत्रपणे, स्वाभिमानाने जगण्याची किल्ली दिली होती बरं का मुलांनो, ''उद्योगाचे घरी, देवता लक्ष्मी वास करी!''

◈◈◈

# अहो ऐकलंत का?...✍

**- सौ. रेश्मा**

## फिटे अंधाराचे जाळे...

संत रामदास स्वामींच्या अनेक गोष्टी लहानपणी वाचल्या होत्या. गुरू-शिष्याचं नातं! सद्गुरूंना आपल्या शिष्यांना किंचीतही दुःखी झालेले पाहावत नाही, त्यासाठी ते आपल्या देहाचीही पर्वा न करता, कसं आपल्या शिष्याला घडवत असतात हे वाचून विलक्षण कसली तरी ओढ वाटायची, उर भरून यायचं, सगळं अप्रूप आणि आश्चर्य वाटायचं!

पण बोधानंतर माउलींच्या सहवासात असताना, प्रत्येकच वेळी वाटायचं की आपण तर रामदास स्वामींच्या होऊन गेलेल्या गोष्टी वाचल्या होत्या. पण आता वर्तमानात तर प्रत्यक्ष माउली सहवासात त्याच घटना, तेच प्रसंग पुन्हा घडतात आणि आपण अनुभवतोय! पण फरक इतकाच की आता हे सगळं उमजतयं आणि ह्याचा अर्थ उलगडत जातो. पूर्वी हे सगळे चमत्कार वाटायचे, पण माउलींनी त्याचा उलगडा केला व ज्ञानांजन घालून ते पाहण्याची दृष्टीच बदलली.

असाच एक प्रसंग गोंदवल्यात घडला. उत्सव सुरू असतानाच, अचानक माउलींना फणफणून ताप आला. ताप इतका जास्ती होता की, कथेला उभे राहणं अशक्य आहे असे वाटत होते. सकाळची पोथीही झाली नव्हती व माउली झोपूनच होत्या.

गोंदवल्यातले एका शिष्य ह्यांना माउलींच्या तब्येतीविषयी कळल्याबरोबर ते माउलींना भेटायला आले. थोडे दूर उभं राहूनच ते माउलीच्या तब्येतीची विचारपूस करीत होते व बोलता बोलता त्यांच्या डोळ्यातून अश्रुंच्या धारा वाहायला लागल्या. पुरूषासारखा पुरूष पण लहान मुलासारखा हमसून हमसून रडत होता. आम्हाला हे सगळं पाहून अजब वाटत होतं. त्याचा तो भोळा भाव पाहून माउलींनी त्याला जवळ बोलावलं व म्हणाल्या, ''अरे वेड्या, असा काय रडतो? बघ माझ्या पायाला हात लावून, मला ताप आलाय का? जरा थकवा आहे, म्हणून आडवी झाले एवढंच!'' त्यांनी पायाला हात लावून नमस्कार केला. माउलीचे पाय गरम जाणवले नाही आणि



आश्चर्य म्हणजे संध्याकाळी कथाही झाली व चेहऱ्यावर जरासुद्धा थकवा किंवा वेदनेची पुसटशी रेघही दिसत नव्हती. कथेनंतर भक्तांची पांगापांग झाल्यावर रात्री माउलींना फणफणून ताप आला. अगदीच न राहवून शेवटी माउलींना विचारले, ''तुम्हाला खुप ताप आलेला आहे, अंग खुप गरम आहे हे सगळ्यांनाच माहित आहे. मग मगाशी आम्हाला तुमच्या पायाचा स्पर्श गरम का नाही जाणवला? व आता कथेतही काहीही जाणवले नाही. हे कसे?'' माउली म्हणाल्या, ''अगं, त्याचा भाव किती सुंदर आहे. आपल्या गावी येऊन माउली आजारी पडल्या, ह्याचं अतिशय दुःख त्याला होईल. तो फार हळवा आहे. म्हणून असं करावं लागलं!''

त्यावेळी चटकन रामदास स्वामी व शिवाजी महाराजांची गोष्ट आठवली. जेव्हा शिवाजी महाराज रामदास स्वामींच्या दर्शनाला येतात, तेव्हा ते आजारी आहेत हे पाहून शिवाजी महाराज फार दुःखी होतील, म्हणून अंगात तापाने हुडहुडी भरलेली असतानाही ते महाराजांसमोर त्यांच दर्शन, चर्चा होईपर्यंत शांत बसून होते. तसे शिवाजी महाराज स्वामींचा निरोप घेऊन निघतात, स्वामींच्या अंगात परत तापाने हुडहुडी भरते. तात्पुरतं देहाचं दुखणं दूर ठेवलं होतं, तेच प्रत्यक्ष ह्या डोळ्यांनी पाहिलं.

खरंच बॉडी कंट्रोल, बॉडी कमांड हे शब्द आम्ही फक्त ऐकलेच होते. परंतू त्याचे प्रात्यक्षिक तर माउलीने आम्हाला दिलेच पण एका साधकाला हे शक्य आहे हे दाखवून दिले. एखादे आवडीचे काम करताना आपले देहभान हरपते, आपण तहान-भूक विसरतो इथवरच आपला अनुभव सिमित असतो. परंतू महाराज हे देहाला न धरता कार्य करीत असतात. ते त्याचा एखाद्या यंत्राप्रमाणे वापर करीत असतात. म्हणूनच त्यांच्या देहाच्या आजाराचा त्यांच्या कार्यावर परिणाम होत नाही आपण देहरूप नाहीच आहोत, म्हणूनच आपल्याला देहाला, त्याच्या आजाराला जरावेळ बाजुला करता येते हे माउलीने तिथे प्रत्यक्ष दाखविले.

हा प्रसंग पहाता पहाता रामदास स्वामींची गोष्ट नव्याने तर उमजलीच, परंतु माउलींच्या सहवासात डोळ्यावरील अज्ञानाची पटले दूर होत जातात आणि सारे काही स्वच्छ दिसू लागते.

◈◈◈

# सोनियाचा दिनू आजि अमृते पाहिला!...

**- प्रदीप कुलकर्णी**

एक दिवस लताचा फोन आला,''भागिरथी आईंच्या पादुका परवा एकादशीला आपल्या मंदिरात येत आहेत. तर तुम्ही सगळ्यांनी स्वागताला या!'' हे ऐकून अंगावर रोमांच उभे राहिले. ''काय? कुठे? कसं काय?'' वगैरे मनातले प्रश्न ओठावर उमटलेच नाहीत. जवळपास सर्व गुरूभक्तांची हीच अवस्था झाली होती.

बहुतेक जण आपल्या पणजीला पाहु शकत नाहीत. पण अचानक एखाद्याने सांगितले. ''आज तुला तुझी पणजी भेटणार आहे'', तर जो आनंद होईल त्याच्या कितीतरी पट अधिक आनंद लताच्या फोननंतर झाला. कारण भागिरथी आईंबद्दल आमच्या गुरूदेवांकडून तसेच इतर गुरूभक्तांकडून खूप ऐकले होते. तसेच 'चौदा चौकड्यांचे राज्य' वाचताना तर त्या नेहमीच भेटतात. प्रत्येक वेळी गुरूदेव जेंव्हा 'जे जे ज्यावेळी व्हावयाचे...' हे बोध वाक्य म्हणून घेतात, तेव्हा गुरूदेवामध्ये भागिरथी आईंचे दर्शन नेहमीच होत असते.

एखाद्या लहान मुलाला किंवा एखाद्या मोठ्या व्यक्तिलासुद्धा जेव्हा त्याने न पाहिलेल्या त्यांच्या आजोबा किंवा पणजोबांचा मोठेपणा सांगितला जातो, तेव्हां त्याचे ऊर अभिमानाने आपोआपच भरून येते. आपण त्यांचे वंशज आहोत याचा स्वाभिमान वाटायला लागतो व त्यांचा नातू किंवा पणतू म्हणून ते नाव रोशन करावेसे वाटते. त्याहुनही दिव्य असे आमचे भागिरथीआईंशी नाते आहे. कारण हे तर देहापुरते मर्यादित नाही! इथे गुरूपरंपरेने आम्हाला ज्ञानाचा वारसा दिलेला आहे आणि हा फक्त या जन्मापुरताच मर्यादित नाही, तर जन्ममरणाची साखळी तोडणारा आहे.

नदीच्या जलाशिवाय तर आपण जगुच शकत नाही. म्हणूनच आपण उगमस्थानालाही भेट देतो व त्याचे पूजन करतो. भागिरथी आईची ज्ञानगंगा दत्तशिखरावरून माधुरीरूपाने आम्हाला लाभली आहे. म्हणूनच या पूजनाचे सर्व गुरूभक्तांना अप्रूप होते.

तो दिवस होता १६ मार्च २०११ अमलकी एकादशीचा! सकाळीच बरेचसे



गुरूभक्त तयारीसाठी आले. मंदिराच्या दारापुढे रांगोळ्या काढल्या गेल्या, दाराला तोरण बांधले गेले.नटून थटून सर्व गुरूभगिनी दुध-पाणी, ओवाळायचे तबक घेऊन सज्ज झाल्या. साताऱ्याचे गु.भ.कुलकर्णी व गुरूवर्य श्री भुर्के हे पादुका घेऊन येणार होते. गु.भ.अविनाश पाठक व गु.भ.अनिल बल्लाळ त्यांना घेऊन येण्यास गेले होते. होता होता पादुका मंदिराच्या दारात पोहोचल्या. सर्व गुरूभक्तांचे चेहरे आनंदाने फुलून गेले होते. भागिरथीआईंनी वापरलेल्या पादुका आपण पहाणार व पुजणार याचेच कौतुक सर्वांना वाटत होते. आतापर्यंत आम्ही त्यांच्या विचारांची व शिकवणीची पुजा करीतच होतो. गुरूमाउली मंदिराबाहेरच उभी होती. एक सदगुरू दुसऱ्या सदगुरूनां आलिंगन द्यायला येतो आहे असे वाटत होते. गुरूवर्य भुर्के व त्यांना घेऊन येणाऱ्या सर्व गुरूभक्तांचे दुध-पाणी घालून, ओवाळून स्वागत करण्यात आले. पायघड्यावरून पादुका स्थानापन्न झाल्या. भागिरथीआई गुरूदेवांच्या शेजारीच विराजमान झाल्या आहेत असे वाटत होते. सर्व गुरूभक्तांनी पादुकांना अभिषेक केला, आरती केली दुसऱ्या दिवशी पादुकांवर अकरा अभिषेक करून त्यांची प्रतिष्ठापना करण्यात आली. विशेष म्हणजे प्रत्येक गुरूभक्ताला आईंच्या पादुकांवर अभिषेक करण्याची संधि मिळाली.

पूर्वी कधीतरी गुरूदेवांच्या तोंडून ऐकले होते त्याची आठवण झाली. गुरूदेवांजवळ श्रीसस दत्तमहाराज म्हणाले होते, ''रामाच्या मंदिरासमोर जशी मारूतीची मूर्ती असते, तसेच आईंच्या पादुकांजवळ राहण्याची माझी इच्छा आहे.'' खरंच आज इतक्या वर्षांनी श्रीसस दत्तात्रेय महाराजांचे शब्द खरे झाले.

ज्ञान साधने ही कालबाह्य ठरू नयेत म्हणून गुरूमाऊली नेहमीच प्रयत्न करीत असते. मंदिरात नुसते भजन-पूजनच व्हावे असे माउलीचे म्हणणे नसते. तरूण पिढीही आकर्षित व्हावी म्हणून ती नेहमीच प्रयत्न करीत असते. फक्त वेष्टण बदलले तर आतली वस्तू थोडीच बदलते? तिला ती नवनवीन वेष्टणात गुंडाळून प्रत्येकाला देत असते. पण आईच्या पादुका मंदिरात आल्याने या सगळ्यावर शिक्कामोर्तब झाले. आईंच्या पादुका आपणहून याव्यात ह्यापेक्षा सज्जड पुरावा काय हवा? श्रीसस दत्तात्रेय गुरूज्ञान मंदिराला लाभलेला आईंचा हा आशिर्वादच नाही का?

◈◈◈

# विकारांकडून निर्विकाराकडे...✍

- मुक्ता

**आशा?** की मार्ग **आ**त्म्याच्या **शा**लिनतेचा?

आतापर्यंत आपण षड्‌रिपू व षड्‌उर्मी यांना तोंड देत देत, त्यांना नामोहरम करीत इथवर पोहोचलो. त्यांनी अडवलेली वाट शोधत शोधत आलो. परंतू अजुनही रस्ता मोकळा नाहीच! कारण आता या मार्गात षड्‌वासना उभ्या ठाकल्या आहेत. पण आपण तर गुरूपुत्र! आपण थोडेच त्यांना भीक घालणार? त्यांचाही समाचार आपण घेऊच आणि एकेकीला पकडून त्यांना चारी मुंड्या चित करू! कोण कोण आहेत बरं त्या? आशा, मनिषा, कल्पना, इच्छा, तृष्णा आणि वासना'

पहिली उभी आहे ती आशा! 'मनुष्य हा आशेवरच जगत असतो', 'तीच तर त्याला आयुष्य जगायला शिकवते', 'हे काम होईल अशी आशा मला वाटते', 'ए तू निराश नको होऊस!' अशी अनेक वाक्ये आपण ऐकतो. मग ही आशा म्हणजे नेमकी काय? एखादी गोष्ट हवी तशी व्हावी ही धारणा! इथे ही गोष्ट होईलच अशी खात्री नसते, पण ती पूर्ण व्हावी असे वाटत असते.

आशा ही सूक्ष्मदेहाला म्हणजेच दशेंद्रिय व अंतःकरणपंचक ह्यांना त्या त्या विषयाची लागलेली असते. जसे डोळ्याला कोणाला तरी पाहण्याची, कानांना एखाद्याचा आवाज ऐकण्याची आशा असते. खरं म्हणजे ती सूक्ष्म देहाच्या भोगाची पायरी आहे. कधी कधी न घडणाऱ्या गोष्टींचीही आशा लागते. मग तिला आपण वेडी आशा असे म्हणतो. प्रभू रामचंद्रांचीसुद्धा यातून सुटका झालेली नाही. म्हणूनच लहानपणी नभीचा चंद्र हवा म्हणून त्यांनी हट्ट केला.

आता हीच आशा जेंव्हा मनाला लागलेली असते तेंव्हा आपण तिला मनिषा असे म्हणतो. 'हे कार्य करण्याची माझी मनिषा पूर्ण झाली.' असेही आपण म्हणतो. हिचा

**पान नं. १७ वर**



# आनंदाचे डोही आनंद तरंग...✍

- सिद्धेश

सिद्धेशचा हा पहिलाच नृसिंह जयंती उत्सव! सहा महिन्यापूर्वी जेंव्हा मंदिरात आलो, तेव्हापासूनच या उत्सवाची उत्सुकता सुरू झाली. कारण ज्या ज्या वेळी नृसिंह जयंतीचे वर्णन इतर गुरूभक्तांकडून व्हावयाचे, त्या त्या वेळी त्यांच्या चेहऱ्यावर गुरूदेवांबद्दलचे प्रेम दिसून येई व उत्सवाचा आनंद ओसंडून वहात असे व प्रत्येक जण विचारत असे, ''काय या उत्सवाला असणार ना?'' अशाप्रकारे सुरवातीलाच या उत्सवाचे निमंत्रण मिळाल्याने सिद्धेशची उत्सुकता वाढतच गेली.

नृसिंह जयंती उत्सव १२मे पासून सुरू झाला. या वर्षीच्या उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे यावर्षी गुरूदेवांनी 'फार्मविले' या खेळाच्या माध्यमातून वेदांत सागितला. खेळ आणि लहान मुले यांचे नाते तर अतुट आहेच, पण हा खेळ मात्र मोठी माणसेही खेळत होती. गुरूदेवांनी या खेळाचा आणि आपल्या चारही देहांचा संबंध कसा आहे हे सांगितले. त्याच्या आधी गुरूदेवांनी प्रत्येकाकडून आपआपल्या फार्मचे वर्णन करून घेतले होते. जसे फार्मवर आपला कंट्रोल ठेवून आपण वेगवेगळी पिके काढतो, तसेच आपला सूक्ष्म देह, स्थूळा कडून विविध कामे करवून घेऊ शकतो हे सांगितले. प्रत्येकाच्या अंतरंगाचे चित्र त्याच्या फार्मवर उमटलेले असते, असेही गुरूदेवांनी सांगितले. अजुनही एक खेळ खेळला गेला तो म्हणजे 'कॅफे वर्ल्ड!' याद्वारेही गुरूदेवांनी वेदांत शिकवला. हे सर्व पाहुन सिद्धेशला वाटले की परमार्थाचा अभ्यास हा फक्त ग्रंथ किंवा एखाद्या विशिष्ट ठिकाणीच होतो असे नाही.तर तो कोठेही केला जाऊ शकतो. एका खेळाच्या माध्यमातूनही अभ्यास करता येतो याचे खुप आश्चर्य वाटले. गुरूदेव आपल्यासाठी किती प्रेमाने, सोप्या रितीने, किती अमूल्य गोष्ट शिकवतात हे ही आपल्याला माहित नसते.

या उत्सवात लहानांबरोबर मोठेही लहान होऊन आनंद लुटत होते. असा हा सर्व जण एकत्र येऊन, समानतेने आनंद लुटताना सिद्धेशने कोठेही पाहिले नव्हते.

आपण खरं तर किती संकुचित असतो. आपल्याला आनंद हवा असतो पण प्रपंचातला! पण सदगुंरूच्या रुपाने आपल्याला निरतंर आनंदाची कवाडे उघडली जातात आणि समजते की आनंद असाही असु शकतो.!

गुरूदेव आपल्याला बोधात सांगतात की आपण आनंदातून आलो आहोत व परत आनंदातच जायचे आहे व ते आपल्याला निरंतर आंनदी बनवितात. तोच आनंद या उत्सवात सिद्धेशने अनुभवला आणि हा आनंद सिद्धेशकडे चिरकाल टिकेलच, जो अवर्णनीय आहे.

◈◈◈

**पान नं. १५ वरून**

संवाद मनाशी असल्याने साहजिकच ही संकल्प विकल्पाच्या हेलकाव्यात अडकवते.

थोडक्यात काय तर आशा काय नी मनिषा काय, ह्या आपल्याला सूक्ष्मदेहाच्या भोगाच्या वाटेवरच नेऊन सोडतात. त्या पूर्ण झाल्यावर त्या संपतात का? तर नाही. त्या पूर्ण झाल्यावर दुसऱ्या आशा, मनिषा त्यांची जागा घेतात व सूक्ष्म देहात आपण अधिकाधिक अडकतो. मग आपण करायचे काय? तर संत संगाची, श्रवणाची आशा धरावी. अंतर्गत अभ्यासाची मनिषा धरावी. तिची दृष्टी बाह्य जगाकडे न राहता आतमध्ये असावी. तरच सूक्ष्मदेहाला आपण स्वरूपाकडे वळवू शकू. गुरूदेवांना कशाची आशा असते? तर शिष्यांना पूर्णत्वाकडे नेण्याची आशा ते करतात. लघु साधकालाही उत्तम साधक बनविण्याची मनिषा ते बाळगतात. मग त्यांच्याकडेही आशा, मनिषा असतेच ना! पण ती त्यांच्याकडे सत्कार्यासाठी चरणसेविका होऊन राबत असते. मग आपणही आपल्या आशा-मनिषांना वळवून त्यांच्या आशा-मनिषेची पूर्तता का करू नये? मगच आपल्या आशा आकाराशी अनुशासित राहतील व आत्म्याच्या शालीनतेकडे आपली वाटचाल होईल.

◈◈◈



# शब्दांच्या पलिकडले... ✍

**- मधुरा**

एखाद्या गोष्टीची आपण खुप आतुरतेने वाट पाहावी आणि ती घटना घडावी तसा असतो हा नृसिंह जयंती उत्सव! पूर्ण वर्ष या उत्सवाची सगळे वाट पहात असतात. पुढच्या उत्सवात काय काय करायचे याचा बेत आधीपासूनच सगळे मनातल्या मनात करीत असतात आणि मग जसे जसे दिवस जवळ येतात तशी एक्साईटमेंट वाढतच जाते. आता या उत्सवात काय काय असते हे तर सगळ्यांना माहित आहेच. पण यावर्षी एक बदल होता हं! पण तो इतक्यात नाही सांगणार! थोडी उत्सुकता ताणते. आधी आमचे शेड्युल तर सांगते. सकाळी प्रभातफेरी असायची! आम्ही सगळेच वेळेत उठत होतो. प्रभात फेरी झाल्यावर एक वेगळाच उत्साह यायचा! खूप छान वाटायचे. मग आम्ही व्यायाम करायला जायचो. कोणी कितीही म्हटले तरी घरी कोणीही मनापासून व्यायाम करायला तयार होत नाही.नकोच वाटते. पण अभ्यंकर आजोबा व सुलभा आजी यांनी व्यायाम पण इतका इंटरेस्टींग असू शकतो हे शिकवले. व्यायाम करताना सुद्धा मजा येते हे पहिल्यादांच कळले. मग सगळ्यांची एक आवडती गोष्ट म्हणजे ‘गुडबिहेवियर’ वाचन! ‘गुडबिहेवियर’ वाचनामुळे नुसती भाषाच सुधारत नाही तर इतके काही शिकायला मिळते, म्हणजे जे आपल्याला गुरुदेव सांगतात ते आचरणात कसे आणता येईल ते कळते. ‘गुडबिहेवियर’ वाचनानंतर असायचे मैदानी खेळ! अल्पाताईमुळे इतके नवनवीन गेम्स शिकायला मिळाले. तिने नुसते ‘मंडलम कुरू’(गोल करा) म्हटले की आम्ही समजून जायचो की काहीतरी धमाल गेम शिकायला मिळणार! ‘तळ्यात मळ्यात’ असो की ‘पोटॅटो रेस’, सगळ्यात खूप धमाल यायची.

मी मगाशी म्हणाले नं यावर्षी उत्सवात एक बदल होता. यावर्षीचा बदल पोथीत होता. यावर्षीची पोथी हायटेक होती. नाही कळलं? या वर्षीची पोथी कॉम्प्युटरवर होती आणि विषय होता फार्मविले आणि कॅफे वर्ल्ड! पण असे काही लोक होते ज्यांना कॉम्प्युटर युज करायला येत नव्हता. मग त्यांना कॅम्प्युटर यावा म्हणून अतुलदादा आणि हेमाने त्यांना कॉम्प्युटरबद्दल सोप्या शब्दात माहिती सांगितली. त्यामुळे त्यांना

कॉम्प्युटर म्हणजे काहीतरी अवघड, अजब वाटत होते. त्यांना अगदी साधं, सरळ होऊन गेले.

हे कॉम्प्युटर वरचे गेम्स जे गुरूदेवांनी आधीपासूनच खेळायला सांगितले होते त्याप्रमाणे सगळे खेळतही होते. मग जे जे हे गेम्स खेळत होते ते आधी या गेमविषयी बोलले आणि मग याच आधारावर त्यांनी आत्मपरिक्षण केले. म्हणजे या खेळातून काय शिकायला मिळाले हे त्यांनी सांगितले. मग गुरूदेवांनी या गेम्सच्या माध्यमातून वेदांत सांगितला. हे गेम आधीपासून खेळत असल्यामुळे गुरूदेवांनी जे काही सांगितले ते कळायला खुपच सोपे गेले.आपण काहीतरी अवघड, जड ऐकत आहोत असे अजिबात वाटले नाही. ही पोथी ऐकताना लक्षात आलं कॉम्प्युटरवर गेम आपण आधीपासूनच खेळत होतो, पण त्यातूनही गुरूदेव आपल्याला शिकवत असतात. पण आपले तिकडे लक्षच नसते. आपण आपले लक्ष गुरूदेवांच्या शिकवणीकडे ठेवले पाहिजे.

या उत्सवाची अजून एक गोड गंमत होती. येईल ओळखता? हं! हरलात ना! चॉकोलेट!!! यावर्षी मंदिरात संगळ्याना भरपूर चॉकोलेट खायला मिळाले. ते पण गुरूदेवांनी स्वतः बनवले व सगळ्यांना भरवले! आहे ना मज्जा? ह्या सगळ्या प्रोसेसमध्ये इतकी धमाल आली आपण चॉकोलेट नेहमीच खातो. पर वो मिठास कुछ औरही थी! ह्याच्यापेक्षा काय बोलणार?

या उत्सवात अजून एक अ‍ॅट्रॅक्शन काय असतं? बरोबर! मनोरंजनाचे कार्यक्रम! आज कोणती नाटके होणार? कोण काय सादर करणार? याकडे सगळ्यांचे डोळे लागलेले असायचे. यावर्षी तर मोठ्यांनीसुद्धा नाटक सादर केले. यावर्षीच्या नाटकात दोन गोष्टी लक्षात आल्या. सगळ्यांनी वेशभुषेकडे लक्ष दिले. दरवर्षी नाटक बसवायच्या गडबडीत वेशभूषेकडे जरा दुर्लक्षच व्हायचे! पण यावर्षी तसे झाले नाही. त्यामुळे नाटकातील पात्रांच्या भूमिका अधिक उठावदार झाल्या व नाटके परिणामकारक ठरली. दुसरी गोष्ट म्हणजे नाटकाच्या गोष्टी आणि त्यांचे सादरीकरण जास्त प्रगल्भ होताना दिसले.प्रत्येक सीनमागे नाटक बसवताना केलेला विचार दिसला. यावर्षी सुद्धा हेमाने दोन अतिशय सुंदर नृत्ये बसविली. दोन्ही नृत्यविष्कारामध्ये इतकी इमोशन्स होती की आम्ही डान्सेस बघीतले नाही तर अनुभवलेसुद्धा! आकांक्षाने



सुद्धा एक सुंदर कथ्यक नृत्य सादर केले. काही जणांनी छान छान गाणीसुद्धा म्हटली आणि हो वैशाली मावशीने आम्हाला चित्रे काढायची खुप सोपी पद्धत शिकवली आणि चित्रे पाहायला पण शिकवले.

म्हणता म्हणता उत्सव संपला, आणि संपताना किती आठवणी देऊन गेला. काय असतात हे सहा सात दिवस! काय काय शिकायला मिळंत! काय अनुभवलं? इतकं प्रेम, आनंद! खरंच सांगते शब्दात नाही सांगता येणार! पोथी, कथा, प्रल्हादाची गोष्ट याची इतकी वाट पहात असतो आम्ही! ओढच लागते. कधी कधी तर नुसतं तिथे असण्याची सुद्धा ओढ लागते. गुरूदेवांच्या शब्दांचा इतका परिणाम होतो की असा एक क्षण येतो की काहीतरी वेगळच वाटायला लागते. म्हणजे एकीकडे खूप भरून येत असतं तर दुसरीकडे तितकंच शांत वाटत राहतं! काहीतरी वेगळच बोलतेय ना मी? पण काय करू? सारे काही शब्दांच्या पलिकडे!

पण खरंच काय असतं हे सगळं? ज्याच्यामुळे इतका आनंद, इतकं प्रेम अनुभवायला मिळतं? काय असतं की आपण ज्यागोष्टी कधीही करायला तयार झालो नसतो त्या सहज होऊन जातात. काय असत की आपण आपणच राहत नाही. खरंच या प्रश्नांची उत्तरे देणं गरजेचं आहे?

‘शब्दावाचून कळले सारे शब्दांच्या पलिकडले’ असचं ना?

◈◈◈

लवकरच श्रीसस दत्तात्रेय गुरूज्ञानमंदिराची
वेबसाईट सुरू होत आहे.
त्यासंदर्भात अधिक माहिती नंतर देण्यात येईल.

**वि.सु. :** कार्यबाहुल्यामुळे ‘पाझर’चा चैत्र-वैशाख आणि ज्येष्ठ-आषाढचा एकत्रित अंक प्रसिद्ध करीत आहोत

– संपादक

**-Akanksha**

Every year in Nrusinha Jayanti Utsav we get to meet different kinds of people tall, short, shy, bold, old, young so on and so forth. But the common part of that all is we all are children of Gurudev. Even a ninety seven year old granny is a child of Gurudev. This time even grown-ups performed. They participated more actively than we kids did. And they did all kinds of things like dancing, drama, plays etc. The best part of this whole idea is you get to be young again. In the outside world there are boundaries to our behavior, we ought to behave properly. But that's not so here.

We had so much of chocolate that it couldn't fit in our mouth. Of course, Gurudev fed them. Those balls of chocolates were huge. And also I learnt that there is no age for doing things. At sixty years of age we can dance like twenty four years old.

We limited ourselves by bodily boundaries and thought that we are so and so old. In fact, we are always young, never aging (without using any anti-aging creams). And then I realized how stupid of me to think I can't do a certain thing! Gurudev told us that **nothing is impossible!** Then truly, nothing is and nothing can be1`

Had it not been for Her, we would still be as small in our minds as ants. Thanks to gurudev that we realized our vastness and limitlessness!



# मुंगी उडाली आकाशी...✍

**स्वैर अुनवाद - सौ. नीता कुलकर्णी**

दरवर्षी नृसिंह जयंती उत्सवात आम्हाला विविध प्रकारच्या व्यक्ती भेटतात. उंच, बारीक, लाजाळू, धीट, तरूण, वृद्ध आणि काय काय सांग? पण सगळ्यांमध्ये काय साम्य असते? तर सगळे गुरूदेवांची बालके असतात. अगदी ९७वर्षाच्या आजी सुद्धा!

या वर्षीच्या उत्सवाचे वैशिष्ट म्हणजे वयाने मोठ्या असणाऱ्या सगळ्यांचा आम्हा मुलांपेक्षाही सगळ्यात अधिक सहभाग होता.त्यांनी आमच्याप्रमाणेच नृत्य, नाटके, एकांकिका सगळ्यातच हिरीरीने भाग घेतला. या सगळ्या मागची खरी कल्पना म्हणजे प्रत्येकाला बालपणाचा पुनःप्रत्यय यावा! बाह्य जगात प्रत्येकाच्या वागण्यावर मर्यादा असतात. पण इथे तसे नसते.

यावर्षी तर तोंडात न मावेल एवढे मोठे चॉकोलेट मंदिरात बनवले होते आणि ते गुरूदेवांनी स्वतः सर्वांना भरवले. ते प्रंचड, मोठे चॉकेलेट सर्वांनी खाल्ले.

आणखीन एक गोष्ट माझ्या लक्षात आली ती म्हणजे, कोणतीही गोष्ट करायला वयाचे बंधन नसतेच! साठाव्या वर्षी सुद्धा तुम्ही चोवीस वर्षाचे असल्याप्रमाणे नृत्य करू शकता! आपण स्वतःला वयाच्या आणि विचारांच्या कुंपणात अडकवून घेतो. खरं म्हणजे आपण चिरतरूणच (कोणतेही ॲटीएजींग क्रिम न वापरता) असतो. 'मी हे करू शकत नाही' असे जे मला नेहमी वाटते त्याचे मला हसूच आले. कारण गुरूदेवांनी सांगितले, ''**काहीच अशक्य नाही!**'' खरचं काहीच अशक्य नाही!

हे जर मला समजले नसते तर मी माझ्या मनामध्ये माझ्या कल्पनेप्रमाणे एखाद्या मुंगीसारखीच लहान राहिले असते. धन्यवाद गुरूदेवा! तुमच्यामुळेच मला माझे विराट व निःस्सीम रूप समजले!

◈◈◈

## संपादकीय...✍

पहिल्या पावसाची वाट पहाणारा चातक, पावसाळा सुरू झाला की आठवू लागतो. तसेच सुट्टीत येणाऱ्या नृसिंह जयंती उत्सवाची वाट मुले वर्षभर पहात असतात. परिक्षा संपतात केव्हा नी उत्सवाला येऊन दाखल व्हावे केव्हा असे सगळ्यांना होऊन जाते. धमाल, मजा, आनंद असे सर्व काही चाखत चाखतच ज्ञानाचा घास गुरूमाऊली कसा भरवते हे काही कोणाच्या लक्षातही येत नाही. मंदिरात आंनदाला नुसते उधाण आलेले असते. फक्त मुलेच का? तर नाही! सर्ववयीन यात मुलेच होण्याचा आनंद लुटतात. या नृसिंह जयंतीचा आस्वाद या 'पाझर' मध्ये घेता येईल.

खरं म्हणजे आपण कितीही मोठे झालो तरी गुरूमाऊलीच्या पुढ्यात बालकच असतो. अगदी नृसिंह जयंती उत्सवांतील मुलांप्रमाणे!. कारण माउलीकडुन आपल्याला प्रत्येक वेळी काहीना काही शिकायला मिळतेच याचाच प्रत्यय 'अहो ऐकलत का?' हे सदर वाचताना येईल.

पंचमहाभुते व त्रिगुण कसे निर्माण झाले याचे वर्णन 'सदाचरण'मध्ये आले आहे. हीच अष्टधा प्रकृती तमोगुणी झाली तर तिला त्यातून बाहेर काढायला 'गोजिरवाणी'त शिकविले आहे.

ह्याच अष्टधा प्रकृतिला निर्विकाराकडे आपल्याला न्यायचे आहे. त्यातील अडथळे माउली जाणतेच! म्हणूनच तर 'विकाराकडून निर्विकाराकडे' ही लेखमाला आपण सुरू केली आहे. त्यातील दुसरा टप्पा मागील 'पाझर'मध्ये पूर्ण झाला. आता तिसरा व अंतिम टप्पा म्हणजेच वासनांवर विजय आपल्याला मिळवायचा आहे. याचेच वर्णन या अंकात आले आहे.

या सर्व अडथळ्यांवर मात केल्यावर जे रूपाला येते त्याचेच वर्णन 'भक्तगाथे'तील श्रीसस बलभीम महाराज करवितात. त्यांच्या चरित्राचा आलेख पहात पहातच आपल्याला पारमार्थिक वाटचाल करायची आहे.

या वाटचालीतच अनेक सुखद धक्के महाराज देत असतात. कसे? ते 'सोनियाचा दिनू आजि अमृते पाहिला' मध्ये अनुभवास येईल. या आठवणींच्या हिंदोळ्यावरच आपल्याला प्रगति साधायची आहे.



## उत्सव विशेष...✍

### महाशिवरात्री उत्सव

**माघ कृ. ११ ते माघ कृ. १३ शके १९३२, दि. २८ फेब्रुवारी ते २ मार्च २०१०**

**मूळपद**

*सर्व सोडूनी, गर्व मोडूनी, तोडूनी टाकी तू भवा।*
*जटाजूट पशुपति तव पूजनी, परमप्रीती हे जडो जीवा।।१।।*
*तू हरहर शंभू सदाशिवा....।*
*सकळही सृष्टी कल्याणकर्ता , आनंदरूप तू देवा।*
*रूद्रा तू वीरभद्रा प्रकटूनी हृदया, लावी ज्ञानाचा दिवा।।२।।*
*तू हरहर शंभू सदाशिवा....।*
*म्हणे सोहिरा नवद्वारे, तुम्ही परमामृत हे पिवा।*
*सर्वा तू बिनपर्वा करूनि, दे आनंद हा नित्य नवा।।३।।*
*तू हरहर शंभू सदाशिवा....।*

महाशिवरात्रीच्या कथा व 'जय जय गौरी शंकर' हे रात्री केलेले नाटक तर रंगलेच! पण मुख्य दिवशी बुक्क्याच्या वेळेस गुरूदेवांनी उभा केलेला 'अर्धनारीनटेश्वर' सगळ्यांच्याच लक्षात राहिला.

### नृसिंह जयंती उत्सव

**तिथी वैशाख शु. ९ ते वैशाख कृ १ शके १९३३, १२ मे ते १८ मे २०११**

**मूळपद**

*स्मरता नित्य हरी। मग ती माया काय करी।।धृ।।*
*नामरूपात्मक सकळही नाशक। निश्चय हा विवरी।।१।।*
*शांतीदयापर श्रवणी सादर। भवभ्रम न उरे उरी।।२।।*
*सहजपूर्ण निजरंगी रंगूनी। सदगुरू पाय धरी।।३।।*

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर, जी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २, गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

To,

BOOK-POST

**संस्थेतील**

**प्रमुख सप्ताह व उत्सव**

**श्री स.स. दत्तात्रय महाराज जयंती उत्सव**
पौष कृ.१ दि. १३ जाने ते २० जाने. २०११

**महाशिवरात्र उत्सव**
माघ कृ १३ दि. २८ फेब्रु. ते २ मार्च २०११

**श्री स.स. भागिरथीनाथ पुण्यतिथी उत्सव**
रंगपंचमी फाल्गुन वद्य ५
दि. १६ मार्च ते २४ मार्च २०११

**नृसिंह जयंती उत्सव**
वैशाख शु. १४ दि. १२ मे ते १८ मे २०११

**गुरुपौर्णिमा उत्सव**
आषाढ शु. १५ दि. ७ जुलै ते १६ जुलै २०११

**श्री स.स. माधुरीनाथ वाढदिवस उत्सव**
श्रावण शु. १३ परम १४
दि. ५ ऑगस्ट ते १२ ऑगस्ट २०११

**श्री स.स. दत्तात्रय महाराज पुण्यतिथी उत्सव**
कार्तिक कृ. १
दि. ३ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर २०११

## मंदिरात केले जाणारे अन्य उपक्रम

| | |
|---|---|
| **श्री स.स. बलभीममहाराज जयंती** | - गुढीपाडवा - चैत्र शु. १ |
| **श्री स.स. लक्ष्मणमहाराज जयंती** | - वसंतपंचमी - चैत्र शु. ५ |
| **श्रीरामनवमी** | - चैत्र शु. ९ |
| **श्री स.स. नारायण महाराज जयंती व पुण्यतिथी** | - आषाढ कृ. ५ |
| **श्री स.स. भागिरथीनाथ जयंती** | - आषाढ व १५ दीप अमावस्या |
| **श्रीकृष्णजयंती** | - श्रावण कृ १ ते ८ |
| **श्री स.स निरंजनस्वामी पुण्यस्थिती** | - परिवर्तीनी एकादशी- भाद्रपद शु. ८ |
| **श्री. स.स. बलभीममहाराज पुण्यतिथी** | - इंदिरा एकादशी - भाद्रपद व. ११ |
| **नवरात्र** | - अश्विन शु. १ ते ११ |
| **श्री स.स. निरंजनस्वामी जयंती** | - कार्तिक शु. ८ |
| **श्रीदत्तजयंती** | - मार्गशीर्ष १५ |
| **दासनवमी** | - माघ व १ ते व. ९ |